दिनांक :     .१२.२०१९

**प्रति,**

**मा. केंद्रीय गृहमंत्री,**

**भारत सरकार, नवी देहली**

**विषय : हिंदु साधू आणि देवता यांचा अवमान करणारा 'दबंग ३' चित्रपट प्रदर्शित न करण्याविषयी...**

**महोदय,**

'सलमान खान फिल्म'द्वारे २० डिसेंबर २०१९ या दिवशी 'दबंग ३' हा हिंदी चित्रपट प्रदर्शित होणार आहे. त्या चित्रपटाचा ट्रेलर आणि त्यातील काही गाणी नुकतीच प्रदर्शित झाली आहेत. त्यात 'हूड-हूड दबंग-दबंग' या गाण्यामध्ये हिंदु साधू, तसेच भगवान शिव, श्रीराम आणि श्रीकृष्ण यांचा अवमान करण्यात आला आहे. अभिनेते सलमान खान यांच्याबरोबर साधूंना पाश्चात्त्यांप्रमाणे हिडिस आणि आक्षेपार्ह पद्धतीने नाचतांना दाखवले आहे. त्यामुळे समस्त हिंदु समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्या आहेत.

*** तरी या अनुषंगाने लक्षात आलेल्या काही गोष्टी येथे देत आहोत .....**

१. या चित्रपटातील एका गाण्यात नदीच्या घाटावर अनेक साधूंना हिडिस आणि आक्षेपार्ह पद्धतीने नाचतांना दाखवले आहे. काही साधूंना पाश्चात्त्यांप्रमाणे गिटार वाजवतांना दाखवले आहे. काही साधूंना त्यांच्या जटा-केस गाण्याच्या चालीवर ठेका धरत उडवतांना दाखवले आहे. तसेच ते साधू सलमान खानसोबत नाचतांनाही दाखवले आहेत.

२. याच गाण्यातील तालावर एका दृश्यात श्रीकृष्ण, श्रीराम आणि भगवान शिव हे सलमान खानला आशीर्वाद देतांना दाखवले आहे.

३. अशा प्रकारे साधूंना नाचतांना दाखवणे आणि चित्रपटातील मनोरंजनासाठी देवतांचे मानवीकरण करणे आदी गोष्टींतून हिंदु साधू आणि देवता यांचा अवमान करण्यात आला आहे.

४. चित्रपटाचा ट्रेलर आणि एक गाणे यांत हे चित्रण आहे. तर प्रत्यक्षात पूर्ण चित्रपटातही अशाप्रकारे देवता आणि साधू यांचा अवमान असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

५. 'दबंग ३' या चित्रपटाच्या विरोधात हिंदु जनजागृती समितीने केंद्रीय चित्रपट परिनिरीक्षण मंडळाला (सेन्सॉर बोर्डाला) नुकतेच निवेदन दिले आहे. त्यामध्ये चित्रपटातील हिंदूंच्या धार्मिक भावना दुखावणारे आक्षेपार्ह दृश्ये वगळावीत, तोवर तो प्रदर्शित करण्यास अनुमतीपत्र देऊ नये, अशी मागणीही करण्यात आली आहे.

६. 'ओ माय गॉड', 'पीके', 'पद्मावत', '३ देव अंडरकव्हर भगवान', 'केदारनाथ' आदी अनेक हिंदी चित्रपटांत हिंदूंच्या उच्च देवतांना मॉडर्न नटांच्या ठिकाणी दाखवण्यात आले आहे. या सर्व चित्रपटांच्या विरोधात अनेक ठिकाणी आंदोलने करून तक्रारी दाखल करण्यात आल्या, निषेध नोंदवण्यात आला; पण हिंदुबहुल देशात हिंदूंच्या धार्मिक भावनांची दखल कोण घेणार ? परिणामी या चित्रपटांवर वा संबंधितांवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही आणि हिंदूंच्या देवतांच्या टिंगल करून करोडो रूपये कमावण्यातही आले, हे दुर्दैव आहे.

७. 'कलास्वातंत्र्य' आणि 'व्यक्तीस्वातंत्र्य' यांच्या नावाखाली हिंदूंच्या देवतांची टिंगल करण्याचा प्रघात चित्रपटसृष्टीत पडल्याचे दिसून येत आहे; मात्र भारतीय राज्य घटनेच्या कलम २५ नुसार 'धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार'ही भारतीय जनतेला मिळाला आहे. देवतांचे विडंबन करणे, हिंदूंच्या श्रद्धांचे भंजन करणे यांतून या अधिकाराचे हनन होत आहे. परिणामी हिंदु समाजात रोष निर्माण होत आहे. सामाजिक शांतता, धार्मिक सलोखा अबाधित राखणे हे शासनाचे कर्तव्य असल्याने या गोष्टींकडे शासनाने लक्ष देणे आवश्यक आहे.

८. सध्या लोकांसमोर जाणीवपूर्वक विकृती सादर करायची आणि त्यामुळे धार्मिक भावना दुखावल्याने गदारोळ माजल्यास फुकटात प्रसिद्धी करून घ्यायची अन् त्यातून आर्थिक लाभाची गणिते मांडायची, हा वाममार्ग निर्माते-दिग्दर्शक निवडत आहेत. हे समाजस्वास्थ्यासाठी लाभदायी नाही, हेही शासनाने ध्यानात घ्यायला हवे.

९. ज्या प्रकारे सलमान खानने हिंदु साधूंचा अवमान केला आहे, त्या प्रकारे मुल्ला-मौलवी किंवा पाद्री-बिशप यांना असे नाचतांना दाखवण्याचे धाडस त्याने दाखवले असते का ?, जर कोणी असे दाखवले, तर त्याचे काय परिणाम होतील, हे चित्रपट निर्मात्यांना चांगलेच माहित आहे. 'विश्वरूपम्' या चित्रपटात मुसलमानांच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या, म्हणून तामिळनाडूमध्ये या चित्रपटावर बंदी लादण्यात आली, 'द दा विंची कोड' या चित्रपटात ख्रिश्चनांच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या म्हणून गोव्यात या चित्रपटावर बंदी लादण्यात आली; मात्र हिंदूंच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या, तर कोणतेही राज्य सरकार किंवा केंद्र सरकार याची दखल घेत नाही, असे दिसून येते. असे होण्यामुळे शासनाच्या लेखी हिंदूंच्या धार्मिक भावनांची किंमत नसल्याचे चित्र समाजात दिसून येत आहे. हे शासनाच्या धर्मनिरपेक्ष तत्त्वात न बसणारे आहे.

**※ तरी या प्रकरणी आम्ही पुढील मागण्या करत आहोत ....**

१. 'दबंग-३' चित्रपटातून हिंदूंच्या श्रद्धास्थानांचे, तसेच भारतीय संस्कृतीचे विडंबन करणारे प्रसंग सेन्सॉर बोर्डाने तात्काळ काढावेत. सेन्सॉर बोर्डाची आतापर्यंतची बोटचेपी भूमिका पहाता ते काही करतील, अशी अपेक्षा राहिलेली नाही, त्यामुळे शासनाने हस्तक्षेप करत याबाबत पुढाकार घ्यावा.

२. जोवर चित्रपटातील वादग्रस्त प्रसंग वगळून चित्रपट हिंदु संघटनांच्या किंवा धर्माचार्यांच्या शिष्टमंडळाला दाखवला जात नाही, तोवर चित्रपटाला प्रमाणपत्र देण्यात येऊ नये. सेन्सॉर बोर्डाने असे न केल्यास शासनाने तशी सूचना सेन्सॉर बोर्डाला करावी.

३. चित्रपटाच्या माध्यमातून हिंदूंची मंदिरे, श्रद्धास्थाने, धर्मग्रंथ आणि देवता यांचा वापर चुकीच्या पद्धतीने केला जाऊ नये, यासाठी केंद्रीय चित्रपट परिनिरीक्षण मंडळाने नियमावली बनवावी, अशी सूचना शासनाने करावी.

४. अनेक जण कायद्याचा धाक नसल्याने देवतांचे विडंबन करू धजावतात. त्यामुळे लवकरात लवकर शासनाने नाटके, चित्रपट, विज्ञापने, काव्ये, चित्रे आदींद्वारे हिंदु धर्म, धर्मग्रंथ, देवता, संत आणि राष्ट्रपुरुष यांचे होणारे विडंबन रोखण्यासाठी कठोर कायदा करावा.

आपला नम्र,

संपर्क :

प्रत :

**मा. केंद्रीय सांस्कृतिक मंत्री, भारत सरकार, नवी देहली**